# रामदासांचं ‘मन’

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. १३–०१–२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

कवयित्री बहिणाबाईंनी आपल्या ‘मन’ या काव्यात मनाचं उघडं वाघडं पण वास्तव रूप मांडलं आहे, तर संतश्रेष्ठ रामदास स्वामींनी मनाच्या सुयोग्य नजरेचा विचार केला आहे. आदर्श व्यक्तिमत्व घडवण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी ‘मनाचे श्लोक’ लिहिले आहेत. रामदास स्वामी हे श्रीरामाचे परमभक्त आणि श्रेष्ठ संतही होते. त्यामुळे मनाच्या श्लोकात रामभक्ती, रामनाम आणि राम महत्ता यांचा उल्लेख होणं स्वाभाविकच आहे. श्रीगणेश आणि शारदेला नमन करून त्यांनी ‘मना सज्जना भक्तीपंथेंची जावें ।’ या चरणाने सुरुवात केली आहे. बहिणाबाईंनी म्हटल्याप्रमाणे मन अतिशय चंचल, खट्याळ, नाठाळ असतं. एखादं मूल अतिशय खोडसाळ असतं. त्याला दरडावलं, मारलं तर ते तात्पुरतं शांत बसतं. पण मनाने शांत झालेलं नसतं. उलट जास्तच व्रात्यपणा करतं. ‘‘बाळ, तू शहाणा आहेस ना? मग असं करायचं नाही हं.’’ असं जर प्रेमाने म्हटलं तर त्याच्यात सुधारणा होण्याची शक्यता जास्त. म्हणूनच तर रामदासांनी ‘मना सज्जना’ म्हणून सुरुवात केली आहे. ज्या मार्गाने त्यांनी मनाची अत्युच्च अवस्था प्राप्त केली, त्याच मार्गाने सर्वांनी जावं अशी त्यांची अपेक्षा आहे. ‘भक्तीपंथेची जावे ।’ भक्तीमध्ये श्रद्धा, लीनता, आपुलकी असे अनेक भाव सामावलेले असतात. इथे श्रद्धा हा शब्द वाचताक्षणीच नास्तिकांच्या अंगावर काटा उभा राहील. याला कारण स्वत:ला श्रद्धाळू समजणाऱ्यांमध्ये बहुतांश अंधश्रद्धाळूच जास्त असतात. पण ‘अध्यात्म–विज्ञाना’प्रमाणे श्रद्धा आणि अंधश्रद्धेतला ढोबळ फरक असा की, ‘जी निरपेक्ष असते ती श्रद्धा आणि सापेक्ष असते ती अंधश्रद्धा’. समर्थ रामदास स्वामींनी ‘दासबोध’ हा आध्यात्मिक ग्रंथ लिहिला आहे. त्यात त्यांनी आध्यात्मिक जीवनाचं मर्म दिलं आहे. रामदास स्वामी स्वत: ब्रह्मचारी असूनही उत्कृष्ट संसार कसा करावा, याची नजर त्यांनी समाजाला दिली आहे. तर स्वत: संन्यासी असुनही शिवरायांना राज्य कारभार कसा करावा, याची नजर दिली आहे. शास्त्रोक्त ग्रंथांमध्ये मनाचं विश्लेषण काय दिलं आहे हेही आता या सदरात पाहणं उपयुक्त ठरेल.